GES1070802
21-07-08

नायब तहसिलदार (गट-ब) संवर्गात सरळसेवा प्रवेशाने नेमणूक करताना अपंगासाठी आरक्षण ठेवण्याबाबत.

महाराष्ट्र शासन,
महसूल व वन विभाग,
शासन निर्णय क्र.संकीर्ण १०९८/प्र.क्र.२१८/ई-९
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
दिनांक:- ११ जुलै २००८.

वाचा:-१) शासन निर्णय,सामान्य प्रशासन विभाग क्र.एसआरव्ही १०७७/३५७६/१४३३/१-अ, दिनांक २३.५.१९७८.

२) शासन निर्णय,सामान्य प्रशासन विभाग क्र.एसआरव्ही १०८१/प्र.क्र.१५/१६-अ, दिनांक ७.९.८२.

३) शासन परिपत्रक,सामान्य प्रशासन विभाग क्र.एसआरव्ही १०९७/प्र.क्र.१२/९७/१६-अ, दिनांक २.५.१९९८.

४) शासन निर्णय,सामान्य प्रशासन विभाग क्र.आरसीटी १०९५/प्र.क्र.२३०,दि.१३.११.१९९८.

५) शासन निर्णय,महसूल व वन विभाग,क्र.संकीर्ण १०९८/प्र.क्र.२१८/ई-९,दि.१८.१०.२०००.

६) शासन परिपत्रक सामान्य प्रशासन विभाग क्र.एसआरव्ही १०९९/प्र.क्र.३७/९९/१६-अ, दिनांक ४.३.२००२.

७) शासन परिपत्रक सामान्य प्रशासन विभाग क्र.अपंग-१००३/प्र.क्र.१२७/२००३/१६-अ, दिनांक ६.५.२००४.

८) शासन निर्णय,महसूल व वन विभाग,क्र.संकीर्ण १०९८/प्र.क्र.२१८/ई-९,दि.२०.९.२००४. व शुध्दीपत्रक समक्रमांक दिनांक ९.११.२००४.

**<u>शासन निर्णय :-</u>**

केंद्र शासनाकडून अपंग व्यक्ती (समान संधी, संपूर्ण सहभाग व हक्काचे संरक्षण) अधिनियम, १९९५ (१९९६ चा क्रमांक १) हा दिनांक ७.२.१९९६ पासून लागू करण्यात आलेला आहे. या अधिनियमाच्या कलम ३२ अनुसार शासनाने अपंगासाठी आपल्या आस्थापनेवरील पदे शोधून काढणे आवश्यक आहे. या अधिनियमाच्या कलम ३३ अनुसार, अपंगाच्या नियुक्तीसाठी शासन निर्णय महसूल व वन विभाग,क्र.संकीर्ण १०९८/प्र.क्र.२१८/ई-९, दिनांक १८.१०.२००० अन्वये नायब तहसिलदार संवर्गासाठी सरळसेवेद्वारे नियुक्ती करण्यासाठी पुढीलप्रमाणे ३ टक्के आरक्षण ठेवण्यात आले आहे.-

| | |
|---|---|
| १) अंध,अल्पदृष्टी (दृष्टीहिनता) | १ टक्का |
| २) मुकबधिर | १ टक्का |
| ३) अस्थिव्यंग किंवा मंदमती | १ टक्का |
| | एकुण ३ टक्के. |

जिल्हाधिकारी कार्यालय रत्नागिरी
शाखा:-
आवक नं.:- ९३८

२. जनहित याचिका क्र.१२९/०३ संदर्भात मा. उच्च न्यायालयाने दिलेल्या आदेशानुसार पुर्नरचित करण्यात आलेल्या तज्ञ समितीने शासन निर्णयाच्या पुनर्विलोकनानंतर केलेल्या शिफारशी विचारात घेऊन यापूर्वीचा दिनांक ३०.९.२००४ चा शासन निर्णय अधिक्रमित करण्यात येत असून या शासन निर्णयान्वये अपंगांसाठीच्या सुयोग्य पदांची सुधारित पदनिश्चिती करण्यात येत आहे.

१) अंध,अल्पदृष्टी (दृष्टीहिनता) P.S. (Partialy Sighted)/L.V.(Low Vision)
२) कर्णबधिर P.D. (Partialy Deaf)
३) अस्थिव्यंग किंवा मंदमती O.L. (One Leg)/O.A. (One Arm)

३. हा निर्णय सामान्य प्रशासन विभाग तथा सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग यांच्या सहमतीने निर्गमित करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

( अ. तु. खोत )
कार्यासन अधिकारी,
महसूल व वन विभाग.

प्रति,

१) सर्व विभागीय आयुक्त
२) सर्व जिल्हाधिकारी.
३) सामान्य प्रशासन विभाग (१६-अ)
४) सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग (सुधार-३)
५) मा. मुख्यमंत्री यांचे खाजगी सचिव.
६) मा. मंत्री (महसूल) यांचे खाजगी सचिव.
७) मा. राज्यमंत्री (महसूल) यांचे खाजगी सचिव.
८) सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई (पत्राने)
९) कार्यासन,ई-१,ई-३,ई-४ महसूल व वन विभाग,मंत्रालय, मुंबई ३२.
१०) निवड नस्ती,ई-९ कार्यासन महसूल व वन विभाग.

---